# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/02/2023 (सोमवार) दुपार


### दुखापत

**पो.स्टे. भिवापूर :–** अंतर्गत २८ किमी अंतरावर मौजा नांद शिवार येथे दिनांक १९/०२/२०२३ चे १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– ईमरतसींग प्रितमसींग बावरी, वय ३५ वर्ष, रा. नांद ता. भिवापुर ही आपले राहते घरी संडासमध्ये गेली असता फिर्यादीचा लहान भाऊ नामे– सेवासिंग बावरी यांचे पत्नीने विनाकारण संडासचे वादाचे कारणावरूण अंगणातील दगड फेकुन फिर्यादीच्या डोक्याला मारूण जखमी केले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १२७० अशोक सिंग ठाकुर हे करीत आहे.

### शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत पोलीस स्टेशन खापा येथे दिनांक १९/०२/२०२३ चे १७.५० वा. सुमारास फिर्यादी नामे– पोलीस शिपाई देविदास साहेबराव लोनकर (ब.नं. ७९०) वय ३३ वर्ष, रा. पोलीस स्टेशन खापा हे सफौ ४६३ पोशि २७३ यांचे सह पोलीस स्टेशला नरेन्द्र भोयर याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करीत असताना यातील आरोपी नामे– नथ्थु लोभाजी ढोबळे, वय ५५ वर्ष, रा. नंदापुर खापा ता. सावनेर याने पोलीस स्टेशन खापा येथे बडेगाव बिटचे कक्षात येवुन ''तुम्ही नरेन्द्र भोयर ला का आणलं, तो माझा साळा आहे त्यास आता कोणतेही कार्यवाही न करता सोडुन दया, मी नथ्थु ढोबळे आहे, तुम्हाला नाही माहीत मी कोण आहे मी तुमची वाट लावुन देईल'' असे म्हणुन जोरजोराने ओरडुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन फिर्यादीचा कॉलर पकडुन फिर्यादीला लाथानी मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम कलम ३५३, ३३२ भादवी सहकलम ११०, ११७ मपोका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक खडसे ठाणेदार पोस्टे खापा मो. नं. ९५०३२५०३७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर